# ।। मलिनता का अंग ।।

# मारवाडी + मराठी

✻

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

।। अथ मलिनता को अंग लिखंते ।।

।। रेखता ।।

रज बिरज सूं देहे ऊतपन भई ।। गर्भ के बास नव मास रहियो ।।
ऊँच अर निच को अेक अस्थान हे ।। अेक भगद्वार होय जन्म लीयो ।।
सप्तही धात तत्त पाँच को पुतळो ।। आत्मा अेक संसार सारो ।।
अेक प्रमात्मा सकळ कूं सिरजीया ।। अब मोय बताय दे गोत न्यारो ।।
अेक ही अहार नीहार सुखराम के ।। झरे नवद्वार मळ मुत्र माही ।।
अेसा सरीर मे बास कर पांडीया ।। सुच आचार को काम कांई ।।१।।

ब्राम्हण लोक म्हणतात की,आमची जात खूप पवित्र आहे आणि आम्ही वर्णात सर्वात उच्च आहोत या विषयी आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,अरे तुमचा देह कोणत्या वस्तु पासून बनला आहे ते तर पहा.स्त्रीचे रज आणि पुरुषांच्या वीर्यापासून तुमचा देह बनला आहे.तर याची पवित्रता बघा(पहा)की स्त्री रजस्वला जेव्हा होते तर तेव्हा तिला चार दिवसा पर्यंत कोणी स्पर्श ही करीत नाही.वीर्य इतके अपवित्र आहे,हे सर्व लोक जाणतातच.स्त्री रजस्वला होवून गेल्यावर तिला कोणी स्पर्श करीत नाही. तसेच तिला ही कोणालाही लोक हात लागू देत नाही म्हणजे हे रज अशुद्ध आहे.या अशुद्धतेने हे ब्राम्हणाचे शरीर बनले आहे.गर्भात नऊ महिनेपर्यंत स्त्रीच्या रजानेच पोषण होऊन शरीर बनते. मलेच्छ ही कपड्याला थेंब लागल्यावर स्नान करतात.तर असे अपवित्र वस्तुपासून तुमचे शरीर बनले आहे.नंतर गर्भवासात नऊ महिने राहिले तेथे कशी अपवित्र जागा होती ते पहा.जेव्हा आईच्या पोटात होतो आई जे काही खात होती त्याची विष्टा होत होती आणि जे पित होती त्याचे मूत्र बनत होते.त्या विष्टा आणि मूत्रात नऊ महिन्यापर्यंत गर्भात राहिलो.आम्ही ब्राम्हण ब्रम्हाच्या मुखाने क्षत्रिय भुजेने, वैश्य पोटाने आणि शुद्र पायाने उत्पन्न झाले आहे,असे ब्राम्हण लोक सांगतात.परंतु कोणीही मुखाने,भुजेने,पोटाने आणि पायाने उत्पन्न न होता सर्व चारी वर्ण एका भगाच्याद्वारेच जन्म घेऊन आले आहेत.तरी ही ब्राम्हण सांगतात की आम्ही उच्च आहोत.अरे तर उच्च कसे व नीच कसे?जसे शुद्र साडे तीन हात उंच आणि वैश्य सात हात उंच,क्षत्रिय चौदा हात उंच आणि ब्राम्हण अठ्ठावीस हात उंच,अशाप्रकारे जर तुम्हाला पैदा करणाऱ्याने केले असते तर तुम्हीही उंच म्हणवले असते(म्हणवते).परंतु पैदा करणाऱ्याने एका भगद्वारेने उत्पन्न करून एक सारखेच पैदा केले आहे.तेव्हा तुम्ही उत्तम,दुसरे मध्यम कसे झाले तरीही तुम्ही ब्राम्हण म्हणवता(म्हणतात)की आमचा वर्ण रंग उत्तम आहे.जसे ब्राम्हणाचा सफेद,क्षत्रियाचा लाल, वैश्याचा पिवळा आणि शुद्राचा काळा असा वर्ण सांगतात.परंतु ब्राम्हणांमध्ये चारी रंगाचे मनुष्य आहेत आणि शुद्रामध्ये

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

ही कित्येक सफेद रंगाचे,कित्येक लाल रंगाचे आणि पिवळ्या रंगाचे मनुष्य आहेत.तर कमी जास्त वर्ण कोठे राहून गेला.उत्पन्न कर्त्याने वर्ण वेग–वेगळा पैदा केले असते तर उच्च आणि नीच वर्ण मानला गेला असता.ब्राम्हण म्हणाले की,आमची जात ब्राम्हण आहे,परंतु दुसऱ्याही बहुतेक जातीमध्ये तुमच्यापेक्षा किती उंच होऊन गेले आहेत ते बघून घ्या.

१)वशिष्ठ–अप्सरा(गाणिका)पुत्र,२)कृष्ण–द्वैपायन व्यास मत्स कन्या ढीवर महाराच्या मुली पासून ३)महामुनी–मातंगी पुत्र ४)विश्वामित्र–क्षत्रिय पुत्र ५)श्रृंगी ऋषी–हरीणी पुत्र ६)अगस्त ऋषी–कुंभ(घड्यापासून) ७)ब्रम्हा–कमळापासून ८)वाल्मिक–सांडली पुत्र, कोणी कोणी पासी पुत्र कोणी भिल्ल,कोणी कोळी पुत्र म्हणतात.९)गौतम–गाईपासून १०)नारद–दासी पुत्र ११)अनुचर ऋषी–हत्तीणी पुत्र १२)द्रोणाचार्य–द्रोणापासून १३) भारद्वाज–शुद्रीणीपासून१४)मातंग ऋषी–मातंगी(मांगीनपासून)१५)मंडूक ऋषी बेडकीच्या गर्भापासून१६)अंगीक ऋषी–मधु(शहद)पासून १७)जांबुक ऋषी–जांबुका पासून १८) कौशिक ऋषी–कुश पासून१९)दुसरा वाल्मिक–शर्गरा(स्वपच)२०)गोकर्ण–गाई पासून हे असे असे दुसऱ्या जातींमध्ये ही तुमच्यापेक्षा अनेक उंच होऊन गेलेत तर जातीचे काय कारण राहून गेले.कर्माने ब्राम्हण आहे म्हणतात तर कर्म कोणालाही करता येतात आणि देहाला ब्राम्हण म्हटले तर ब्राम्हणाच्या मेल्यावर त्याच्या शरीराल्या जाळणाऱ्याला ब्रम्ह हत्या लागायला पाहिजे.नावाला ब्राम्हण म्हटले तर नाव(नाम)अनेक आहे.जनेऊ घातल्याने ब्राम्हण म्हटले तर तुमच्या स्त्रीयांना जनेऊ नाही आहे.त्या जनेऊच्या शिवाय शुद्रणी आहेत.त्याच्या हाताचे तुम्ही अन्न खातात.सर्वांना ब्राम्हणापासून अती शुद्र मलेच्छ चाण्डाळा पर्यंतचे देह सात धातूंचे बनले आहे.सात धातू(रस,रुधिर,मांस, मेद, मज्जा,अस्थी आणि रेत)अशाप्रकारे सर्वांचा देह सात धातूंचा बनला आहे.शुद्रात रक्त आहे तर ब्राम्हणात काही दूध नाही आहे.शुद्रात हाड(हड्ड्या)आहेत,तर ब्राम्हणात काही चंदनाची लाकडे नाहीत.अशाप्रकारे सर्व एक सारखे धातूचे सर्व ही देह उत्पन्न झाले आहे.ज्या पाच तत्वाचे शुद्राचे शरीर बनले आहे त्याच पाच तत्वाचे ब्राम्हणाचे ही शरीर बनले आहे.असे हे सर्वचे सर्व सात धातू आणि पाच तत्वाचे शरीर असतांना, त्याच्यात साऱ्या संसारात आत्मा एक सारखी आहे आणि एकाच परमात्म्याने सर्व उच आणि नीच उत्पन्न केले आहे तर आता मला सांगा गोत्र वेग–वेगळे(उच्च आणि नीच गोत्र)कसे झाले?(जाती कशा झाल्या?)सर्व आहार(खाणे–पिणे)एक सारखेच दिसून येते.त्या खाण्याच्या पदार्थांमध्ये जे दूध आहे ते जनावरांचे हड्डी मास गाळून त्यापासून दूध निघते. तुम्ही जे पाणी पितात,त्याच्यात नऊ लाख जातीचे जीव राहतात.त्या जीवांच्या पत्नी कासवाची कासवीन,मत्स्याची (माशाची–मासळी)मासळी,बेडकाची बेडकीन,मगराची

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

मगरीन अशाप्रकारे नऊ लाख जातींच्या जीवांच्या पत्न्या पाण्यातच राहतात.त्या पाण्यातच रजस्वला होतात आणि पाण्यातच प्रसूती होते.ती त्यांची सर्व गन्दगी(घाण) पाण्यातच राहते,तसेच ते पाण्यातच मरतात ही आणि पाण्यातच सडतात.अशा पाण्याला तुम्ही पितात,त्या पाण्याने कोणतेही पवित्र काम करतात आणि अन्न खाते वेळी (जेवतांना)हड्ड्यांनी बारीक कुटून तुम्ही अन्न खातात.हड्ड्यांच्या दातांनी बारीक कुटून खातात.तुमच्या शरीरात मळ,मूत्र,मेद,मज्जा अशा तऱ्हेने भरलेले आहेत,तुमच्या शरीराच्या नऊ द्वारातून मळ–मूत्र झिरत राहते.अशा शरीरात तुम्ही निवास करतात. आता शुच(शुद्ध)आणि आचाराचे काम काय राहिले?(एकाच बापाचे पुत्र परमात्म्याने पैदा केलेले,उंच आणि नीच कसे असतील?।।१।।

कुबुध कळाळ घरे बिषे मद पी रहयो ।। काम चमारड़ो तोय चूंटे ।।
भूक की भांग पी मन बिकळी भयो ।। मेर मरजाद बिन पड़े ऊठे ।।
पाप तो पारधी फंद ले रोपीयो ।। भ्रम के भिलड़े भाल संद्यो ।।
नेण कसायड़ो हेर कर मारसी ।। म्होका जाळ माहे जीव फंद्यो ।।
ठग अहँकार ब्हो प्यार कर ठगीयो ।। लोभ लबारड़ो नित लोढे ।।
मेणका पांच पचीस तोय लूंटसी ।। सबळ सरणा बिन नाय छोडे ।।२।।

तुमच्या आत जी कुबुद्धि आहे तीच कलाल(दारू विकणारी)आहे.विषय रस घेतात हेच दारू पिणे आहे.तुमच्यात कामना आहे,तीच चांभार आहे.जसे चांभार चामड्याला तोडतो, तसेच कामना तुम्हाला तोडत राहते.भूक लागते आणि भूकेने मन व्याकुळ होवून जाते.जसे भांग पिल्याने मनुष्य व्याकुळ होवून जातो त्याचप्रकारे भूकेने व्याकुळ होऊन जातो.मान मर्यादे शिवाय नशेत जसे पडतो उठतो आणि हा पारधी जसे फंद लावतो तसेच पाप कर्म तुम्हाला फासामध्ये टाकून देतो आणि तुमच्या आत जो भ्रम आहे तोच तुमच्यात भिल्ल आहे.तो भ्रमाचा तीर मारत राहतो.हे डोळे(दृष्टी)जे आहेत ते कसाई आहेत.ते शोधून मारतात.हा जीव येथे मोहाच्या जाळ्यात फसून राहिला आहे,तुमच्या आत जो अहंकार आहे,तोच तुमच्यात ठग आहे.तो अहंकार नेहमी तुम्हाला ठगवत राहतो आणि तुमच्यात जो लोभ आहे,तोच लोहार आहे.लोहार जसे लोखंडाला मारत राहतो.तसेच हा लोभ तुम्हाला मारत राहतो.हे पाच इंद्रिय आणि पंचवीस प्रकृति हे मेणा (एक लुटणारी जात) आहे.हे तुम्हाला लुटतात,तर सबळची (बळवानाची) शरण घेण्याशिवाय हे कोणालाही सोडणार नाही.

क्रोध चंडाळ अर चाय ब्हो चूंहड़ी ।। त्रस्ना तेलणी प्राण पीले ।।
मंछया धोबणी पटक पछाडीयो ।। दुबध्या डाकणी तोय कीले ।।
झूट पट साळ मे करम कोळी बसे ।। कपट का पटकूं साध जोड़े ।।

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

कुटम की बाड़ीयां काळ माळी धस्यो ।। फूल फळ कुपळया मरोड तोडे. ।।
सब ही जात तोय पिंड मे पांड्रीया ।। सुच आचार किम चले थारा ।।
दास सुखराम चहूं ब्रण ही शुद्र हे ।। ब्रम्ह की भक्ति किया ब्रम्ह सारा ।।३।।

तुमच्या आत जो क्रोध आहे,तोच चांडाळ आहे.एक वेळ एका गावच्या पाटलाला नीच जातीच्या मनुष्यावर क्रोध आला त्याला मारण्याकरीता काठी उचलून गेला तेव्हा बोलला की,बाबा थोडे थांबा,माझ्याजवळ भाकरी आहे,ती मला बाजूला ठेवू द्या,नंतर मला मारा नाही तर माझी भाकरी अशुद्ध होऊन जाईल.तेव्हा पाटील बोलला अरे,माझ्याने तुझी भाकरी अशुद्ध होते का?तेव्हा तो नीच जातीचा मनुष्य बोलला, तुमच्याने भाकरी अशुद्ध होणार नाही,परंतु हा जो तुझ्यात क्रोध आला आहे तो चांडाळ(मेहतर)आहे.तर चांडाळामुळे आमची भाकरी अशुद्ध होते आणि हा चांडाळ(मेहतर)तुझ्यात आहे. यामुळे मी भाकरी वेगळी ठेवतो.अशाप्रकारे एक वेळ एक चांडाळीन रस्त्यावर झाडू लावत होती आणि दुसऱ्या बाजूने एक पंडित आला.तो पंडित त्या मेहतरनीला बोलला की,तू बाजूला होवून जा,तुझी छाया माझ्यावर पडेल,याकरीता तू झाडणे बंद कर.तू झाडू लावत आहेस,तर त्याची धूळ माझ्या शरीरावर येते ती माझ्यावर येवू देऊ नकोस.ती मेहतरीन थांबून गेली परंतू आधीची उडत असलेली धूळ काही थांबली नाही.तेव्हा पंडिताला खूप क्रोध आला.तेव्हा ती मेहतरीन त्या पंडिताच्या जवळ येवू लागली आणि तिची छाया पंडितावर पडल्याने त्या पंडिताला खूप क्रोध आल्याने शिव्या देवू लागला. तेव्हा ती मेहतरनी त्या पंडिताचा हात पकडून बोलली की चल माझा नवरा घरी चल तेव्हा तो पंडित आणखीच भडकून शिव्या देत बोलला की,मला हाताने स्पर्श करून अशुद्ध करुन दिले आणि मला तुझा नवरा म्हणतेस,याची तुला लाज का येत नाही. तेव्हा मेहतरीन बोलली की महाराज तुम्हीच तर मला कथेत सांगितले होते की,क्रोध चांडाळ आहे.तोच माझा पती मेहतर आहे.त्याला मी घेवून जात आहे.ही गोष्ट ऐकून पंडित हसायला लागला.तेव्हा मेहतरनी बोलली की बेलाशक जा.मी आपल्यापासून काढून टाकले आणि तुझ्या आत जी चाहणा आहे(इच्छा आहे)ती चुढेल सारखी तुला देत आहे आणि तुझ्यात जी तृष्णा(तहान)आहे तीच तेलीन आहे.तेलीन जशी तेल काढण्याकरीता तिळाला पिळत राहते.तशीच तृष्णा तुमच्या प्राणाला पिळत राहते, तुमची मनीषा(इच्छा)तुम्हाला पटकवून राहते.तुमच्या आत जी दुविधा आहे ती डाकीण अहो.(जसे डाकीण कलेजा खाते).तसेच दुविधा तुमचा कलेजा खात राहते.तुमच्यात जी असत्यता आहे तिच तुमच्यात कोळी आहे.जसे कोळी जाळ विणते वेळी तुटलेले धागे सांधत राहतो.तसेच तुमचे कर्म जे आहे,ते मल्लाहसारखे आहेत.असे कपडा विणणारा कोष्टी कपडा विणतो.तसेच हा कपट आहे.हे कपट तुमचे कर्म सांधून जोडून देते.तुमचे

हे कुटुंब एक बगीचा आहे.जसे माळी बगीच्यात येवून फूल–फळ आणि कोम मुरडून, तोडून–तोडून घेऊन जातो.तसेच या परिवारातील बगीच्यात काळ येऊन माळ्या सारखा फूल(नविन खुललेले(तरुण)मुल वा मुली)आणि फळ(फळांमध्ये कच्चे फळ म्हणजे जवान,(तरुण)नौजवान आणि पक्के फळ प्रौढ)आणि कोम(नविन निघालेले अंकुर, नविन जन्मलेले मुल)यांना माळ्यासारखे काळ तोडून–मरोडून घेवून जातो.अरे ब्राम्हण ह्या सर्व जाती तुझ्या शरीरात आहेत.आता तुझी शुचता(शुद्धता)आणि आचार कसे चालणार?आदि सतुगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हे चारी वर्ण शुद्रच आहेत, परंतु ज्याने सतस्वरुप ब्रम्हची भक्ती करुन सतस्वरूप ब्रम्ह जाणला ते सर्व ब्राम्हण आहेत.तर ब्राम्हण,क्षत्रिय,वैश्य,शुद्र याच्यातील कोणी ही असो सतस्वरूप ब्रम्हची भक्ती करणारे सर्व ब्राम्हण होतील.।।२।।

**कूकरे जाय ठठेर को चिगळीयो ।। आण घर मांय मुख छेड़ हांड़ी ।।**
**सेर अधसेर की घाट तां मांय हे ।। ब्राम्हणी देख जुं नाय छाड़ी ।।**
**ऊंदरा मार मंजार घर मे रहे ।। कीड़ीयां कीट वहां बास किया ।।**
**भिष्ट की माखियां ऊड घर भेळीयो ।। थाळ प्रसाद कूं छाय लीया ।।**
**नार रूत ध्रम ज्हाँ रक्त जळ बेहेत हे ।। सरप ता छांय अंध होत वांही ।।**
**दास सुखराम आछोत माने नही ।। करत प्रसाद ऊण हात जांही ।।३।।**

कुत्रा जाऊन आधी मेलेल्या जनावरांची हाडे,मांस खाऊन आला तोच कुत्रा तोंड न धुता त्या रक्ताने भरलेल्या तोंडाने,तुमच्या घरात येऊन मातीच्या हंडीत ठेवलेल्या घाटाला ज्वारी दळून तिला शिजवतात,त्याला घाट म्हणतात आपले तोंड लावतो.त्या हंडीत ठेवलेली शेर अर्धा शेर ज्वारीचा घाट(ज्या हंडीत होती त्याच्यात)कुत्र्याने तोंड टाकले,असे ब्राम्हणीने पाहिले,परंतु ब्राम्हणीने ती हंडी वा तो घाट काही फेकला नाही.कुत्र्याने तोंड टाकले असे पाहून ही ब्राम्हणी बोलली,कुत्रा तोंड टाकीत होता,परंतु मी टाकू दिले नाही.तुमच्या घरात मांजर राहते,तुमच्या घरात राहून मांजर उंदिर मारते आणि खाते आणि तिच मांजर तोंड पाण्याने न धूता स्वयंपाक घरात फिरते आणि कशाला न कशाला तर तोंड लावूनच देते.घरातच मुंग्या,किंडे,मकोडे राहतात.विष्टेवर बसलेल्या माश्या पाय न धूता जेथे वाटेल तेथे बसतात.तुमच्या करीता बनवलिलेल्या भोजनावर खुपश्या माशा बसलेल्या राहतात.स्त्रीचे रजस्वला झाल्यावर रक्त वाहत राहते. ते इतके अशुद्ध असते की,रजस्वला स्त्रीची सापाच्यावर(सापावर)सावली पडताच,तो अंधळा होवून जातो.गर्भवती स्त्रीच्या आत घाण भरलेली राहते.गर्भवती स्त्रीच्या छायेनेही साप अंधळा होवून जातो.तर हे इतके घाण असतांनाही त्याला मानत नाही आणि अशा गर्भवतीच्या हाताचे बनलेले भोजन तुम्ही करतात.असे आदि सतगुरु सुखरामजी

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

महाराज बोलले.।।३।।

कवत ।।

चुहडो चित्त हराम ।। भ्रम भंगी घट होई ।।
दुबध्या दाणू नार ।। मन बिकळी कहे सोई ।।
मन्छया नारी संग ।। तरक तेलन घट मांई ।।
गोत संग अज्ञान ।। आस बेस्या घट क्राई ।।
थोरी मन मे मान ।। ठग ऊर घात रहावे ।।
अे सुखिया संग होय ।। ऊत्तम सो कुण कुवावे ।।४।।

हे नीच जातीचे जे लोक आहेत.त्यांच्या पेक्षाही नीच तुमच्या शरीरात भरले आहे. तुमच्या शरीराच्या नीच बाहेरच्या नीचापेक्षा जास्त कोण म्हणाल तर तुमच्या चित्तात हरामखोरपणा जो आहे तो चूहडा(मेहतर सारखी नीच जातीचा आहे)तुमच्यात भ्रम आहे हाच तुमच्या शरीरात मेहतर आहे.तुमच्याच जी दुविधा आहे तोच दानव(राक्षस) आहे. तुमचे मन दुविधेने व्याकुळ होवून जाते तोच तुमच्या कायेत राक्षसाची पत्नी राक्षसीन आहे.तिच राक्षसीन तुमचे मन व्याकुळ करते.तुम्हाला जी इच्छा उत्पन्न होते.ही तुमच्या सोबत स्त्री आहे.तुमच्या आत जो तर्क उत्पन्न होतो तोच तुमच्या शरीरात तेलीन आहे. तुमच्यात जे अज्ञान आहे तेच तुमचे गोत्र आहे(कुटुंब-परिवार)तुमच्या मनात जी आशा राहते तीच तुमच्या घटात वेश्या आहे.तुमच्या मनात मान आहे की माझा मान सन्मान व्हायला हवा हेच तुमच्या आत ठग आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हे साथी शरीरात राहतात,यांना उत्तम कोण म्हणेल.।।४।।

मोची के घर जाय ।। आण जोडी नर लेवे ।।
पेरे तब पग मांय ।। आण छांटो जळ देवे ।।
जळ सूं भर मस्काय ।। खाल सो सरब रंगाणी ।।
तब बेतो जब साज ।। नीर सूं छिड़ के आणि ।।
मधम उत्तम अब किम भयो ।। कांहा लगाई सूँठ ।।
सुखराम कहे सुण लीजीयो ।। भ्रम क्रम की मूठ ।।५।।

ब्राम्हण लोक चांभाराच्या घरुन चप्पल(जोडे)विकत घेवून येतात.ते जोडे जेव्हा पायात घालतात,तेव्हा जोड्यांवर पाणी शिंपडतात.पाण्याने जर शुद्ध होत असते तर त्या चामड्याला रंगवत्या वेळी चांभाराने पाण्याने भरुन चामड्याला रंगविले होते.जोडे शिवित असतांना तेव्हा त्याच्यावर पाणी शिंपडत होता.तेव्हा ते जोडे पाण्याने उत्तम नाही झाले मध्यमच राहिला तेच जोडे तुमच्या पाण्याने उत्तम कसे होवून गेले?तर ही काय सूंठ(चोखटाई)लावून ठेवली आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की

सर्व लोक ऐका.ही तुमची भ्रमाची आणि कर्माची पकडलेली मूठ आहे.।।५।।

ब्रम्ह न चीन्यो जाय ।। ध्यान की गम नही कांई ।।
नही अजपा जाप ।। प्राण की सुध न भाई ।।
कर हे पान अपान ।। भांग सो पिवे तमाखु ।।
सोई बिप्र चंडाळ ।। अर्थ गीता का भाखु ।।
कळे भ्रम त्रागो करे ।। सुखदेव दया न कोय ।।
सो हे ब्राम्हण केण का ।। अस्सल कसाई होय ।।६।।

तू ब्राम्हण असूनही तू सतस्वरूप ब्रम्हाला तर ओळखले नाही.सतस्वरूप ब्रम्हचे ध्यान कसे इतकी ही तुला समज नाही आणि अजप्पाचा जाप काय आहे हे ही तुला माहित नाही,प्राणायामाची तुला समज नाही,परंतु अपान(नाही पिण्यासारखी वस्तू)पितात.(हुक्का, हुक्क्यावर अग्नी,अग्नीच्या खाली तंबाकू.त्या तंबाकूचा धूर पाण्यात हुक्यातून जातो. तोच हुक्का पाण्यातून नळीद्वारे पितात.या हुक्याच्या नळीतून निघालेला धूर,एकदम दारू सारखा आहे तो तुम्ही पितात,भांग पितात तसेच तंबाखू(चिलमचा)धूर पितात.

।। धूम्र पान रतं विप्र दानं कृत्वातुयो नरः ।।
।। दातारी नरकं यांति ब्राह्मणो ग्राम शूकरः ।।२०।।
।। तेषां संध्या वृथाज्ञान वृथा वैराग्य सेवनम ।।
।। तीर्थ स्नान व्रतं दानं धुम्रपाना वृथा सदा ।।१८।।

तर हे असे अपान करणारे ब्राम्हण चांडाळ आहे.हा हुक्का,भांग,तंबाकू पिण्याची अनुमती सर्व गीतेचा अर्थ पाहिला,परंतु याला पिण्याची अनुमती कोठे ही दिलेली नाही मिळाली आणि पद्य पुराणात तंबाखु पिण्याचा खूप निषेध(विरोध)केला गेला आहे आणि कलह करतात.तसेच भरमत फिरतात.जेथे मागण्यास जातात तेथे त्याने नाही दिले तर त्रागा करतात.मनात दया बिलकुल नाही आहे.तर असे ब्राम्हण म्हणायला ब्राम्हण तर आहे, परंतु हे असली कसाई आहे.।।६।।

नही ब्रम्ह पिछाण ।। ज्ञान की गम नही काई ।।
करे झोड़ ब्हो भांत ।। पतग्रह झेले जाई ।।
लेत ग्रहण मे दान ।। और मूवा पर ल्यावे ।।
घरड्ड जूते जाय ।। रांध घर भोजन पावे ।।
सो ब्राम्हण हे केण का ।। सुण लीज्यो नर नार ।।
गांव कूँट सुखराम कहे ।। तां सूं पेले पार ।।७।।

या ब्राम्हणाला सतस्वरुप ब्रम्हाची ओळख नाही.सतस्वरुप ब्रम्हज्ञानाची समज काही ही नाही.हे प्रतिग्रह घेण्यात खूप तक्रार करुन मागून मागून जबरदस्तीने घेतात.आणखीही ब्राम्हण लोक ग्रहणाच्या वेळी ही दान घेतात.ग्रहणाच्या वेळी मांग आणि भंगी जातीचे

लोक दान घेतात.तश्या वेळी ब्राम्हण ही अष्ट महादान आणि गुप्तदान घेतात.घरात मेलेला मनुष्य राहिला तरी ही दान घेतात.आजारी पडून मरायच्या वेळी जमिनीवर झोपवून देतात.त्यावेळी त्याचा कंठ कफमुळे घर घर बोलून राहतो.त्यावेळी त्याच्या घरी जावून ब्राम्हण लोक भोजन बनवून भोजन करतात.कित्येक वेळा,ब्राम्हण लोकांचा स्वयंपाक बनत राहतो आणि तिकडे त्याचा प्राण निघुन जातो.प्राण निघण्याची गोष्ट घरावाले लपवून ठेवतात.बाहेर प्रगट करु नका नाही तर ब्राम्हण खाणार नाही.स्वयंपाक बेकार होईल.असे म्हणून त्या मुर्द्याला काही पांघरुन झाकून देतात.खोटेच सांगतात की जीव आहे.अशाप्रकारे सर्व ब्राम्हणांनी जेवण केल्यावर घरातील लोक रडायला लागतात.अशी घटना शंभरातून तीस वेळा जरुर होते.शेवटी मृत्यू वेळी तर शंभरातून नव्वद वेळा खातात.त्यावेळी दान घेतात.त्या दानाला घुरुड काको दान मारवाडी भाषेत म्हणतात.घुरुड काको दान घेणे खूप वाईट असते.असे सर्व लोक म्हणतात.तर असे हे ब्राम्हण तर मेहतरपेक्षा ही खूप नीच आहेत.असे आदि सतगुरु महाराज सांगतात.।।७।।

हाड़ मास मळ मुत्र ।। और लोही तन तेरे ।।
त्वचा खाल नख चख ।। प्राण पवन मन घेरे ।।
रोग भोग सुत नार ।। और पसवा सब होई ।।
जो होय जग को व्यवहार ।। ताय मे कसर न कोई ।।
भग गेले तूं आवीयो ।। अब ब्राम्हण किम होय ।।
अरथ कहो सुखराम क्हे ।। इंष्ट द्राही तोय ।।८।।

तुझ्या शरीरात हाड,मांस,मल,मूत्र आणि रक्त आहे.त्वचा,चामडी,नख,डोळे,प्राणवायु आणि मन यात घेरलेले आहे.रोग,भोग,स्त्री-मुल,पशु सर्व दुसऱ्या जातीच्या लोकां सारखे तुमचे ही आहे.जो सर्व संसाराचा लोकांचा व्यवहार आहे.त्या दुसऱ्या जातीच्या लोकांच्या व्यवहारात आणि तुमच्या व्यवहारात काहीही अंतर नाही.तू भग(योनी)च्या रस्त्याने आला आहे तर आता(संसारात)ब्राम्हण कसा झाला याचा मला अर्थ सांग.तुला तुझ्या कष्टाची शपथ आहे.तू ब्राम्हण कसा झाला हे मला सांग?असे आदि सतगुरु महाराज बोलले.।।८।।

सुणो बेष्णो नांव ।। बिस्न की भक्त समायां ।।
सामी ईण प्रकार ।। शिव कूं निस दिन गाया ।।
बिप्र कहिये एम ।। बेद ब्रम्हा का बाचे ।।
ब्राम्हण ईण गुण होय ।। ब्रम्ह का चरणा राचे ।।
किसब लार सब जात हे ।। सुण लीज्यो नर नार ।।
किसब गयां सुखराम कहे ।। जात हुई सब खुवार ।।९।।

तू ऐक विष्णुची भक्ती केल्याने वैष्णव होतो आणि रात्रं-दिवस शिवाचे नाव गाणारे सामी(संन्यासी)होतात.ब्राम्हणाच्या चरणात राहिल्याने ब्राम्हण होतात.तर जसे-जसे आपले-आपले कसब(हुन्नर)करेल.त्या त्या कसबच्या मागे सर्व जाती आहे.जातीचा कोणीही असो आणि तो शिवण काम करेल,तर त्याला लोक शिंपी म्हणतील. अशाप्रकारे आपल्या-आपल्या कसबच्या(हुन्नरच्या)प्रमाणे सर्व जाती आहेत.हे सर्व स्त्री-पुरुष ऐका.ज्या जातीचे कसब सुटून गेले तर ती जाती नाहीच्या सारखी होवून जाते(मिटून जाते).अशा रीतीने ब्रम्हला नाही जाणल्या कारणाने,त्या ब्राम्हणाचे ब्राम्हणत्व चालले जाते.।।९।।

चोपाई ।।

**बूझ्यां कहे हम ब्राम्हण हम पिंडत ।। नित ऊठ क्रम कमावे ।।**
**जन सुखराम भजण की बेळयां ।। होको भर मंगवावे ।।१०।।**

विचारल्यावर सांगतात की आम्ही ब्राम्हण आहे.आम्ही पंडित आहे.नित्य उठून जे लागतील ते कर्म(जे वाटेल ते)करतात.(जसे शेती करणे,उंट आणि गाड्यांचे भाडे देणे, पत्र घेवून गावात जाणे,नोकरी करणे,स्वयंपाक करणे,शेण काढणे,झाड-झूड करणे, इ. शुद्रासारखे सर्व तऱ्हे-तऱ्हेचे कर्म करतात.भाकरी सोबत घेवून शेतीचे काम करण्यास दूरच्या शेतात जातात आणि तेथे खातात.ब्राम्हणाचे कोणतेही कार्य करीत नाही.भजन इत्यादी काहीही करीत नाही.उष:काळी(पहाटे)भजन करण्याच्या वेळी आपल्यापेक्षा लहान्याला(छोट्याला)हुक्का भरून आणण्यास सांगतात.असे आदि सतगुरु महाराज बोलले.।।१०।।

**आरो सुण गांव परगांवा ।। सुबे पोस ऊठ धावे ।।**
**जन सुखराम हात मे होको ।। छाणो संग धुकावे ।।११।।**

आरा म्हणजे मरणाऱ्याच्या नंतर अकराव्या-बारव्या दिवशी ब्राम्हण भोजन करतात त्याला आरा(श्राद्ध क्रिया)म्हणतात.ते कोठेही श्राद्ध आहे असे ऐकून पहाटे सकाळी उठून आपल्या गावातून दुसऱ्या गावात जातात.त्यावेळी,हात तोंड धुण्याचा तर त्यांना वेळ मिळत नसल्या कारणाने एका हातात हुक्का आणि एका हातात जळती उपली घेवून रस्त्याने चालत जातात आणि चालत चालत हुक्का खेचत राहतात.तर संध्या स्नानाचे कामच काय राहिले?असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।११।।

**अेक हात आब ने:पकडी ।। ने:मुख माय अड़ाई ।।**
**जन सुखराम चले यूं पंडत ।। जोड़ी खुरे चड़ाई ।।१२।।**

(रस्ता चालता-चालताच)एका हातात हुक्याची आव,(चीलमच्या खालची नळी)आणि (तोंडात घेवून धूर खेचण्याची नळी)ती तोंडात अटकून घेतात.एका हातात जळती

राम उपली घेवून या थाटाने हे पंडित दक्षिणेसाठी हे पळत जातात आणि पायात चढाऊ जोडा घालून हुक्का पीत जातात.।।१२।।

**कपड्डा ब्होत गरक रहे मेला ।। क्रिया धर्म न जाणे ।।**
**सो सुखराम ब्राम्हण असा ।। चंडक रूप बखाणे ।।१३।।**

कपडे असे मलिन(मळके)राहतात की,त्यातून दुर्गंधी येते.ते आपले कपडे सुद्धा साफ ठेवत नाही.ते ब्राम्हणांची क्रिया आणि ब्राम्हणाचा धर्म काय जाणतील आणि काय करतील ?ते ब्राम्हण तर असे आहेत की त्यांना चांडाळाचे(मेहतरचे)रूप म्हणा.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।१३।।

**भांग तमाखु अमल तिजारो ।। मिल मिल बोहोत बखाणे ।।**
**जन सुखराम घणी मनवारां ।। बिप्र बेद ओ छाणे ।।१४।।**

तेथील गावात इकडचे–तिकडचे चारी बाजूचे ब्राम्हण जमा होतात.तेथे आपल्या जवळील भांगेची,तंबाखूची,अफीमची आणि पोस्तूची(खसखसची)प्रशंसा करतात.सर्व मिळून या वस्तूंचे वर्णन करतात.माझ्या जवळची चांगली आहे आणि आमच्या गावात चांगली तेज उत्पन्न होते अशी बढाई करतात,परंतु भजन भक्ती आणि ज्ञानाची कोणतीही गोष्ट काढीत नाही.आपल्या जवळील तंबाखू दुसऱ्याला घेण्याकरीता एक–दुसऱ्याला खूप आग्रह करतात.या विप्राचे(ब्राम्हणांचे)या नशेच्या वस्तूंची शोभा करणे,हा यांचा वेदाचा विचार करणे आहे.हे ब्राम्हण भांग,तंबाखू,अफीम याचाच विचार करतात हेच यांचे वेद वाचणे (शिकणे)आहे.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।१४।।

**सारी रात भूरके लेणे ।। बिप्रा नींद न आई ।।**
**जन सुखराम भजन की बिरीयां ।। सोय रहया घर माही ।।१५।।**

(लग्नात ब्राम्हणांना बनीये लोक भूर देतात,लग्नाच्या रात्री काही दक्षिणा देतात,त्याला भूर म्हणतात.)त्या भूरचे पैसे घेण्याकरीता ब्राम्हण लोक रात्रभर जागत बसतात.त्या दक्षिणेचे पैसे मिळल्यावर घरात झोपून जातात.तर आता थोडा वेळ जागून भजन करायला पाहिले,परंतु भजन करीत नाही.(भजन न करता)झोपून जातात.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।१५।।

कुंडल्या ।।

ब्रम्ह कर्म क्रिया बाहेरो ।। ब्राम्हण हुवे न कोय ।।
मे तुज बूझु पिंडता ।। आ सच कन झूटी होय ।।
आ सच कन झूटी होय ।। न्याव सूं कहीये मोही ।।
कन ब्राम्हण घर जन्म ।। धार ब्राम्हण ज्यूं होई ।।
सुखराम कहे सुण नार की ।। क्या बिध कीवी जोय ।।

ब्रम्ह क्रम क्रिया बाहेरो ।। बाम्हण हुवे न कोय ।।१।।

तोंडाने सांगतात की ब्रम्ह कर्म केल्याशिवाय ब्राम्हण होत नाही असे तुम्ही सांगता परंतु अरे पंडित,मी तुला विचारतो,ब्रम्ह कर्म केल्याशिवाय ब्राम्हण होत नाही ही गोष्ट खरी आहे किंवा खोटी.याचा न्यायाने विचार करून तुम्ही जे सांगतात की,ती गोष्ट खरी आहे की खोटी आहे हे मला सांगा,का फक्त ब्राम्हणाच्या घरी जन्म घेतल्यानेच ब्राम्हण होवून जातो का?आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,तू तुझ्या स्त्रीची काय विधि केली आहे आणि तुझी स्त्री ब्रम्ह कर्म क्रिया करीत नसेल तर ती तुझी स्त्री ही ब्राम्हण नाही होऊ शकत असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।१।।

में तुज बूझू पिंडता ।। धिन तुम तेरा ज्ञान ।।<br>
नारी घरमे शुद्र हे ।। तुम ब्राम्हण हुवा आन ।।<br>
शुद्र की भीन्न कर माने ।। असल शुद्र घर माय ।।<br>
ताय ऊत्तम कर जाणो ।। सुखराम केहे केणी कीते ।।<br>
रेणी कित कूंई मान ।। में बुझूं तुम पिंडता ।।<br>
धिन तुम तेरा ज्ञान ।। ।।२।।

पंडित मी तुला विचारतो,धन्य तू आहे आणि तुझे ज्ञान.तुझ्या घरची स्त्री(विना यज्ञोपवीतची)शुद्रीण आहे.(तर शुद्रीणपासून जन्मलेले आणि शुद्रीणीच्या हाताचे खाणारे) तुम्ही ब्राम्हण कसे होऊन गेले?तुम्ही शुद्राची घृणा मानतात,तर तुमच्या घरात ब्राम्हणी आहे,ती तर खरी शुद्र आहे.या ब्राम्हणीला उत्तम कसे मानतात?आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,तुमचे म्हणणे एकीकडे आणि राहणे एकीकडे आहे.तर हे पंडित मी तुला सांगतो.धन्य तु व धन्य तुझे ज्ञान.।।२।।

।। इति मलिनता को अंग संपूरण ।।